CMYK

बीड । बुधवार

२८.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ५७

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955






# महाराष्ट्रात पावसाचा कहर; महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना पाऊस पुन्हा झोडपणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात यंदा मान्सूनने १२ दिवस आधीच हजेरी लावली असून गेल्या काही दिवसांपासून राज्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मंगळवारीही काही भागांमध्ये अतिवृष्टी होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

मुंबईत आज सकाळपासून रिमझिम पाऊस सुरू असून हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट, तर पुणे, सातारा, बीड आणि नांदेडसह काही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबईत परिस्थिती: सोमवारी झालेल्या जोरदार पावसामुळे मुंबईत काही ठिकाणी पाणी साचले होते आणि रेल्वे सेवेवर परिणाम झाला होता. मंगळवारी मात्र रिमझिम स्वरूपात पाऊस सुरू आहे. हिंदमाता, किंग सर्कल, अंधेरी, वांद्रे भागात पावसाचे वातावरण आहे. पुणे जिल्ह्यात तीन मृत्यू: कर्वे नगरमध्ये झाड कोसळून एकाचा मृत्यू, भामा आसखेड धरणाजवळ वीज कोसळून तरुणाचा मृत्यू, तर दौंडमध्ये एका महिलेस प्राण गमवावा लागला. शेतकऱ्यांचे नुकसान: नाशिक जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. येवल्यात झालेल्या पावसामुळे शेतात साठवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

नागरिकांना इशारा: हवामान विभागाकडून पुढील २४ तास अतिशय महत्त्वाचे असून नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे.



### राज्यातील अलर्ट तपशील:

- रेड अलर्ट: रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा घाटमाथा
- ऑरेंज अलर्ट: रायगड, पुणे घाटमाथा, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड
- येलो अलर्ट: मुंबई, ठाणे, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, गडचिरोली

### ●मुसळधार पावसापासून वाचण्यासाठी झाडाखाली थांबले, ८ शेतमजुरांवर कोसळली वीज ; दोघांचा मृत्यू

लातूर जिल्ह्यात गेल्या १० दिवसांपासून सातत्याने पावसाने हजेरी लावली असून आजही सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळं लातूर जिल्ह्यातील अनेक भागात पाणीच पाणी झालं आहे, नदी नाले तुडुंब भरुन वाहत आहेत. जिल्ह्यातील मांजरा, रेणा, तेरणा आणि तावरजा या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मात्र, वीज कोसळून काही दुर्घटना घडत आहेत. शेतात मान्सून पूर्व मशागतीची कामे आणि शेंगा वेचण्यासाठी गेलेल्या ८ शेतमजुरांवर काळाने घाला घातला. ▶▶ उर्वरित पान २ वर

## वांगी ग्रामपंचायत प्रशासनाच्या मनमानी कारभारा विरूध्द हरीभाऊ शेळकेंचे 'भीक मांगो आंदोलन'

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील वांगी गावात ग्रामसेवक असे म्हणतात गोरगरिबांनी घरपट्टी भरा आणि त्याच्यानंतर नाल्या काढू, १५ लाख रुपये पंधरावा वित्त आयोग न काम करता उचलून खात आहेत आणि गोरगरीब जनतेला म्हणत आहेत घरपट्टी आणि नळपट्ट्या भरा नंतर आम्ही गावातला विकास करू असे म्हणणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकऱ्यांना सोबत घेवुन रस्त्यावर 'उतरलेल्या हरिभाऊ शेळके हा तरूण थेट भिकाऱ्याच्या वेशात बीड पंचायत समितीत दाखल झाला आणि बीडीओच्या



दालनासमोर भीक मांगो आंदोलन सुरू केले.

वांगी येथील हरीभाऊ शेळके या तरूणाने अनोखे आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. निगरगट्ट अधिकाऱ्यांचा निषेध नोंदवत हरीभाऊ शेळके याने गावात भीक मागून घरपट्टी आणि नळपट्टी त्यांना नाल्या काढण्यासाठी आणि गावातला विकास करण्यासाठी ग्रामपंचायतला भिक मागून पैसे गोरगरिबांच्या घरपट्टी भरण्यासाठी गेलो असता ग्रामपंचायतीला लॉक दिसले. तिथे दोन घंटे शेळके यांनी त्यांची वाट पाहिली पण कुणी आले नाही. त्यामुळे शेळकेबीड पंचायत ▶▶ उर्वरित पान २ वर

## युवासेना पदाधिकारी यांना खरच वाटल्या का स्कॉर्पिओ गाड्या का तरुण आणी नेता खुश होण्यासाठी नुसत्याच लाडया-गोड्या

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय पटलावर एकनाथजी शिंदे साहेब यांच्या रूपाने एक मुस्तदी, कणखर, आणी जनसामान्य नागरिकांमधून आलेले नेते लाभले आहेत. एकनाथजी शिंदे साहेब यांनी शिवसेना पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील तळागळातील नागरिकांच्या प्रश्नावर आवाज उठवून जनसामान्यांची सेना म्हणजे



एकनाथराव शिंदे यांची शिवसेना असा विश्वास संपादन करत आपली वाटचाल सुरूच ठेवली आहे. तर दुसरीकडे युवासेने मधे कार्य सुद्धा महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात सरस असेच आहे. युवा सेनेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातील तरुण वर्ग जोडला गेला असून एकनाथजी शिंदे साहेब आणी श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वर विश्वास ठेवत शिवसेना आणी युवासेनेला कार्यकर्ते जोडले जात असतांनाच बीड जिल्ह्यात परवा भव्य तिरंगा रॅली निमित्त महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री श्री. संजयजी सिरसाट साहेब उपस्थित होते. तिरंगा रॅली साठी उपस्थित असतांना मात्र बीड मध्ये अजबच प्रकार बघायला मिळाला. आणी तो अजब प्रकार म्हणजे युवा सेनेच्या आणी विशेष:तहा ▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढली

**मुंबई । प्रतिनिधी**

देशाची राजधानी दिल्लीसह कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमध्ये आता पुन्हा एकदा कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार सध्या देशात १००९ सक्रिय कोरोनाचे रुग्ण आहेत. राज्यात आज एकूण ६९ कोरोना बाधित नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. यात नवी मुंबईत ७, पुण्यात २ ,पिंपरी चिंचवड, रायगड, कोल्हापूर, लातूर या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आढळून आला आहे. मागील काही दिवसात कोरोनामुळे चार जणांचा मृत्यू झालाय. कोरोनाचा वाढता धोका लक्षात घेता नाशिक महापालिका अलर्ट मोडवर आली आहे.

राज्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून सध्या राज्यभरात एकूण २७८ सक्रिय रुग्ण आहेत. सध्याचा विषाणू हा घातक नसून सौम्य आहे. ओ मायक्रोन नंतरच्या जे एन. १ चा हा उपप्रकार असून रुग्णाला रुग्णालयात भरती व्हावे लागत नाही. आताचा कोरोना हा सर्दी खोकल्यासारखा सामान्य आहे अशी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड पोलीस दलात मोठी उलथापालथ

### पोलीस अधीक्षकांचा एक आदेश अन् पोलीस निरीक्षकाची उचलबांगडी

**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलीस दलात काही दिवसांपूर्वी पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांच्या आदेशानंतर ६०० हून अधिक पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांनी पुन्हा एकदा आदेश दिला. पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांच्या आदेशाने आता पोलीस निरीक्षक



उस्मान शेख यांची बदली झाली आहे. उस्मान शेख यांची थेट लातूरला बदली करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणादरम्यान भाजप आमदार सुरेश धस यांनी पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. पोलीस निरीक्षक उस्मान शेख हे परळी पोलीस स्टेशनला होते. पोलीस निरीक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

## मरण यावे पंडित नेहरू सारखे

१९६४ ला याच दिवशी वैश्विक मान्य अजात शत्रू पंडित जवाहलाल नेहरू यांनी जग सोडले . जेव्हा पंडितजींचे निधन झाले तेव्हा देशाचे तत्कालीन रक्षा मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण अमेरिकेत शिष्ट मंडळासहित होते .माहिती कळताच चव्हाण साहेब दुखी झाले संपूर्ण आयुष्य गांधी आणि नेहरू या दोन स्तंभाला बांधलेल्या दोरीवर घालवणारे चव्हाण साहेबांना आता नेहरूजींच शेवटचं दर्शन घ्यायचं होत .भारतीय विमान क्षमता कमी आणि दोन वेळा इंधन भरण्यास विमान उतरणार होते .ही माहिती कळताच अमेरिका सरकार ने आपले अधिकृत विमान दिले जे एकाच उडाण मध्ये दिल्लीत पोहचू शकते .आता आणखी एक अडचण होती ती म्हणजे वेळत पोहचू शकत नव्हते कारण पाकिस्तानच्या आकाशात नो स्पेस झोन होता त्यामुळे सुरवातीला अरब अन मग कोरियाला वळसा घालून दिल्लीला यावे लागणार होते .मात्र पाकिस्तान ला संपर्क करता पाकिस्तान ने देखील स्पेस देऊ केला .आणि चव्हाण साहेब वेळेत दिल्लीत पोहोचले .जगातले सर्वात मोठे राष्ट्र आणि शत्रू राष्ट्राने देखील पंडित नेहरू यांना दिलेली ती मानवंदना होती .



**भागवत तावरे**
**बीड महाराष्ट्र**

## शेतजमीनच्या कामात २३ लाख घेतले, 5 लाख घेताना रंगेहात अटक; उपजिल्हाधिकारी ACB च्या जाळ्यात

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचं प्रमाण वाढल्याचं दिसून येत आहे. कारण, एसीबीच्या धाडीत ग्राम सेवकापासून ते तहसीलदारांपर्यंत कारवाई केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. विशेष म्हणजे परभणी जिल्ह्यात महिला क्रीडा अधिकाऱ्यासही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली होती. या घटनेनं जिल्ह्यात खळबळ उडाली होती, आता छत्रपती संभाजीनगरमध्ये चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांस




अटक करण्यात आली आहे. तब्बल ५ लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने आरडीसी महोदयांना रंगेहात अटक केली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात तक्रारदाराकडे तब्बल ४१ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आरडीसी म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना अटक करण्यात आली असून विनोद खिरोळकर असं आरडीसींचं नाव आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठीपूर्वी या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी तब्बल ४१ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार, संबधित तक्रारदाराकडून २३ लाख रुपये घेतले होते. मात्र, तरीही १८ लाख पुन्हा मागण्यात आले होते. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती. या घटनेनं जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

विनोद गोंडुराव खिरोळकर, पद निवासी उप जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# १००० फूट उंच महात्सुनामी धडकणार, वैज्ञानिकांनी दिला गंभीर इशारा



व्हर्जिनिया टेकच्या शास्त्रज्ञांनी संभाव्य मेगात्सुनामीसंदर्भात इशारा दिला आहे. तसंच त्यांनी चिंताही व्यक्त केली आहे. कॅस्केडिया सबडक्शन झोनमध्ये मोठ्या भूकंपामुळे ही महात्सुनामी येऊ शकते अशी भिती त्यांनी व्यक्त केली आहे. उत्तर व्हँकुव्हर बेटापासून कॅलिफोर्नियापर्यंत पसरलेली ही फॉल्ट लाइन अमेरिकेसाठी भूकंपाचा मोठा धोका निर्माण करते. नुकत्याच करण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, पुढील ५० वर्षांत या प्रदेशात ८.० किंवा त्याहून अधिक तीव्रतेचा भूकंप होण्याची शक्यता आहे. ही शक्यता जवळपास १५ टक्के आहे. जर असा भूकंप झाला तर १००० फूट उंचीच्या लाटा किनारपट्टीच्या प्रदेशांना धडकू शकतात, ज्यामध्ये सिएटल, पोर्टलँड सारख्या शहरांचा समावेश आहे. याशिवाय अलास्का आणि हवाईच्या काही भागांचाही समावेश आहे. या लाटा अनेक मैल अंतरापर्यंत जाऊ शकतात, ज्यामुळे संरक्षण यंत्रणांना धक्का बसेल आणि लोकांना बाहेर काढण्यासाठी खूप कमी वेळ मिळेल. त्सुनामीमध्ये सामान्यतः काही फूट उंच लाटा निर्माण होतात. मात्र महात्सुनामी शेकडो किंवा हजारो फूट उंचीच्या लाटा निर्माण करते. या उंच लाटा सामान्यतः भूकंप, समुद्राखालील भूस्खलन किंवा ज्वालामुखीचा उद्रेक यासारख्या महत्त्वाच्या सागरी घटनांमुळे उद्भवतात.

कॅस्केडिया सबडक्शन झोन उत्तर व्हँकुव्हर बेटापासून कॅलिफोर्नियातील केप मेंडोसिनोपर्यंत सुमारे ७०० मैल पसरलेला आहे, जो उत्तर अमेरिकेतील सर्वात भूकंपीयदृष्ट्या सक्रिय प्रदेश म्हणून ओळखला जातो.

कॅस्केडियाचा इतिहास- गेल्या १० हजार वर्षांत, या क्षेत्रात ४३ मोठे भूकंप नोंदवले गेले आहेत. सर्वात अलीकडील भूकंप २६ जानेवारी १७०० रोजी झाला होता. हा भूकंप ९.० रिश्टर स्केल तीव्रतेचा होता. यामुळे विनाशकारी त्सुनामी आली.

संशोधनाच्या प्रमुख लेखिका टीना दुरा यांनी सांगितलं आहे की, जर आज अशी त्सुनामी आली तर पूर येईल आणि परिस्थिती सामान्य होण्यासाठी दीर्घकाळ जाईल.

दक्षिण वॉशिंग्टन, उत्तर ओरेगॉन आणि उत्तर कॅलिफोर्नियाला या नुकसानीचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे, तर अलास्का आणि हवाईलाही गंभीर धोका आहे. त्सुनामीच्या मोठ्या लाटा अनेक मैल अंतरापर्यंत घुसू शकतात, ज्यामुळे किनारपट्टीच्या संरक्षणाला तडा जाऊ शकतो आणि रहिवाशांना बाहेर काढण्यासाठी खूप कमी वेळ मिळेल. ओरेगॉन आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने इशारा दिला आहे की १०० फूट उंचीच्या त्सुनामीसह पुन्हा ९.० तीव्रतेचा भूकंप किनाऱ्यावर येऊ शकतो. २००४ च्या हिंद महासागरातील त्सुनामीमध्ये २ लाखांहून अधिक लोक मृत्युमुखी पडलेल्या भारतासारखे देश विध्वंसाच्या संभाव्य प्रमाणात चांगल्या प्रकारे जाणतात.

# उपासमारीच्या त्रासाला आपण कधी समजू शकणार

## (जागतिक भूक दिन विशेष २८ मे २०२५)

जगात लाखो लोक दररोज उपासमारीच्या वेदनांसह जगतात. म्हातारपण असो, शारीरिक दुर्बलता, गंभीर आजार, अपंगत्व, अनाथत्व असो किंवा इतर कोणतीही असहाय्यता असो, शेवटच्या श्वासापर्यंत भूक भागवण्यासाठी अन्नधान्याची आवश्यकता असते. दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी संघर्ष करण्यात कित्येकांचे आयुष्य संपून जाते. जगात प्रत्येकाला त्यांच्या अन्नाचा पूर्ण वाटा मिळत नाही, आता अन्नातील पोषक तत्वांचा अभाव ही देखील एक मोठी समस्या आहे. उपासमारीची किंमत खूपच कमी असली, तरीही जगातील लोकसंख्येचा एक मोठा भाग ही किंमत चुकवू शकत नाही. माणूस दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी आणि आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी सतत संघर्ष करतो. उपासमारीमुळे खूप कमी वयातच अनेक निष्पाप जीव जातात. श्रीमंतांचे अन्न महाग असू शकते आणि गरिबांचे अन्न स्वस्त असू शकते, परंतु भूक सर्वांसाठी सारखीच असते. पैसा, पद, देश, प्रतिष्ठा, रंग, देखावा, उच्च-नीच, धर्म-जात काहीही असो, भुकेत कोणताही फरक नाही. ज्यांच्याकडे पुरेसे अन्न उपलब्ध आहे त्यांना अन्नधान्याची खरी किंमत माहित नाही, ते फक्त पैशात त्याची किंमत मोजतात, म्हणूनच कदाचित आपला देश अन्न वाया घालवण्यात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. ज्यांच्याकडे विविध अन्न पर्यायांची मुबलक उपलब्धता असते, ते त्यांच्या आवडीनुसार थोडेसे अन्न खातात आणि उरलेले अन्न सहजपणे फेकून देतात. ज्या दिवशी काही कारणास्तव आपल्याला भूक लागली असूनही अन्न मिळत नाही, त्या दिवशी कोरड्या भाकरीचा तुकडा देखील जगातील सर्वात मोठी संपत्ती वाटते. अन्नाअभावी मोठी लोकसंख्या नरकमय यातनांमध्ये जगते. जन्मापासूनच अन्नाच्या कमतरतेमुळे, मुले सर्वांगीण विकासापासून वंचित असतात आणि तेव्हापासूनच त्यांचे संघर्षाचे जीवन सुरू होते. जबाबदाऱ्यांचे ओझे त्यांच्या निष्पाप खांद्यावर येते आणि या जबाबदाऱ्यांसमोर त्यांचे बालपण, हक्क, न्याय, समानता हे क्षुल्लक वाटू लागतात. मुलाचे बालपण आणि निरागसता हिरावून घेतली जाते, भविष्य अंधकारमय दिसते. अन्नटंचाईशी झुंजणाऱ्या लोकांना अधिकाधिक वाईट परिस्थितींना तोंड द्यावे लागत आहे. त्यांना जे मिळेल ते खाण्यास ते तयार असतात; ते लोकांचे उरलेले उष्टे अन्न, कचरा, गवत आणि अगदी माती देखील खातात. हैतीमध्ये, गरीब लोक चिखलापासून भाकरी बनवून खातात. वेळेवर अन्न न मिळाल्यास भूक थेट आपल्या आरोग्यावर परिणाम करते, त्यामुळे शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारचे नुकसान होते. भूक माणसाला गुन्हे देखील करायला लावते.

दरवर्षी २८ मे रोजी जगभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक भूक दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम प्रत्येक खाण्यास पात्र आहे ही आहे. ही थीम प्रत्येकासाठी पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. जगात सर्वांना खाण्यासाठी पुरेसे अन्न पिकवले जाते, म्हणजे कोणीही उपाशी राहणार नाही, तरीही मोठ्या लोकसंख्येला पुरेशा कॅलरीज आणि पोषक तत्वांचा अभाव आहे, कारण त्यांना निरोगी आहार परवडत नाही, तर दुसरीकडे अन्नाची नासाडी होते. दरवर्षी, नऊ दशलक्ष लोक उपासमारीशी संबंधित कारणांमुळे मरतात; यापैकी बरेच जण ५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले आहेत. एकूण बालमृत्यूंपैकी निम्मे कुपोषणामुळे होतात. जागतिक बँकेच्या मते, जागतिक अन्नधान्याच्या किमतीत फक्त १ टक्के वाढ झाल्याने १ कोटी लोक अत्यंत गरिबीत ढकलले जातात. जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांकानुसार, १८.३ टक्के लोकसंख्या अत्यंत बहुआयामी गरिबीत राहते. ८३.७ टक्के गरीब लोक ग्रामीण भागात राहतात. सर्व गरीब लोकांपैकी सुमारे ७०.७ टक्के लोक उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियातील ग्रामीण भागात राहतात.

२०२४ च्या जागतिक भूक निर्देशांकात भारत १२७ देशांपैकी १०५ व्या क्रमांकावर आहे, २७.३ गुणांसह, जे उपासमारीची गंभीर पातळी दर्शवते. अन्न असुरक्षितता आणि कुपोषणाच्या विद्यमान आव्हानांमुळे निर्माण झालेल्या गंभीर उपासमारीच्या संकटावर ते प्रकाश टाकते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२१) मधील अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून येते की पाच वर्षांखालील ३५.५ टक्के मुले अविकसित आहेत. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका यांसारख्या दक्षिण आशियाई शेजारी देशांनी चांगली कामगिरी केली आणि ते मध्यम श्रेणीत आले. यूएनईपी च्या अन्न कचरा निर्देशांक अहवाल २०२४ मध्ये भारत जागतिक स्तरावर अन्न कचरा उत्पादकांमध्ये चीन नंतर अव्वल आहे. भारतात दरडोई घरगुती अन्नाची नासाडी दरवर्षी ५५ किलो आहे, देशातील प्रचंड लोकसंख्येमुळे दरवर्षी एकूण ७८ दशलक्ष टन अन्नधान्य वाया जाते.

जगातील अन्न सुरक्षा आणि पोषण स्थितीच्या २०२४ च्या आवृत्तीनुसार, २०२३ मध्ये ७१३ ते ७५७ दशलक्ष लोकांना उपासमारीचा सामना करावा लागला, म्हणजे जागतिक स्तरावर ११ पैकी एक आणि आफ्रिकेत पाच पैकी एक. अहवालात असेही अधोरेखित केले आहे की २.३३ अब्ज लोकांना मध्यम किंवा तीव्र अन्न असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे आणि ३.१ अब्जाहून अधिक लोकांना पौष्टिक आहार खरेदी करणे परवडत नाही. सेव्ह द चिल्ड्रन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनच्या विश्लेषणानुसार, २०२४ मध्ये किमान १.८२ कोटी मुले उपासमारीच्या परिस्थितीत जन्माला आली, म्हणजेच दर मिनिटाला अंदाजे ३५ मुले. संघर्ष आणि हवामान संकटाचे हे मिश्रण दरवर्षी किमान ८,००,००० अतिरिक्त मुलांना उपासमारीत ढकलते. संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंत जगातून उपासमार दूर करण्याचे ध्येय ठेवले आहे आणि काही क्षेत्रांमध्ये प्रगती होत असली तरी, गेल्या काही वर्षांपासून एकूण उपासमारीची पातळी स्थिर राहिली आहे. हवामान बदल, संघर्ष आणि आर्थिक असमानता यासारखे घटक समस्या वाढवत आहेत. कन्सर्न वर्ल्डवाइडच्या मते, जर प्रगतीचा सध्याचा वेग असाच राहिला तर उपासमारीची पातळी कमी होण्यासाठी २१६० पर्यंतचा कालावधी लागू शकतो.

जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांक २०२४ मध्ये भारत १४३ देशांपैकी १२६ व्या क्रमांकावर आहे. ऑक्सफॅमच्या अहवालात असे दिसून आले आहे की वरच्या १ टक्क्यांच्या उत्पन्नाचा वाटा सातत्याने वाढला आहे. भारतातील वरच्या ५ टक्के लोकांकडे देशाच्या ६० टक्क्यांहून अधिक संपत्ती आहे, तर खालच्या ५० टक्के लोकांचा उत्पन्नाचा वाटा सातत्याने कमी होत आहे. ऑक्सफॅम इंडियाच्या सर्व्हायव्हल ऑफ द रिचेस्ट अहवाल २०२३ नुसार, भारतातील अब्जाधीशांची एकूण संख्या २०२० मध्ये १०२ होती, ती २०२२ मध्ये १६६ अब्जाधीशांवर पोहोचली आहे, तर भुकेल्या भारतीयांची संख्या १९ कोटींवरून ३५ कोटींवर पोहोचली आहे. वस्तू आणि सेवांवरील उत्पादन शुल्क आणि जीएसटीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, ज्याचा थेट परिणाम बहुतेक गरिबांवर होतो. २०२४ मध्ये भारतातील अब्जाधीशांची एकूण संपत्ती २ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सने वाढली, ज्यामुळे २०४ नवीन अब्जाधीश निर्माण झालेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, २०१९-२०२१ मध्ये भारतात कुपोषित लोकांची संख्या २२४.३ दशलक्ष होती, जी एकूण लोकसंख्येच्या सुमारे १६ टक्के आहे.

-लेखक - डॉ. प्रीतम भी गेडाम

पान १ वरून पुढे...

## मुसळधार पावसापासून ...

अहमदपूर तालुक्यातील गोताळा येथे दुपारनंतर जोरदार पावसाला सुरुवात झाली. पावसापासून वाचण्यासाठी हे ८ मजूर एका झाडाखाली थांबले होते. त्याचवेळी या झाडावर वीज कोसळली. या घटनेत ८ पैकी दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यात, विक्रम कारले आणि रंजनबाई समुखराव यांचा जागीच मृत्यू झाला आहे. लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यात वीज पडून झालेल्या दुर्घटनेत दोन जणांचा मत्यू झाला असून उर्वरित सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच त्यांना तात्काळ अहमदपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. येथे जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, घटनेची माहिती मिळतात अहमदपूरचे आमदार आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली. त्यानंतर तात्काळ सहा जणांना पुढील उपचारासाठी लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले आहे.

## वांगी ग्रामपंचायत...

समिती कार्यालयात येऊन दोन घंटे बीडीओंच्या दारात बसले. मात्र तेही कोणी नव्हते. सरपंच घरकुलासाठी पंधरा हजार, गाय गोठ्यासाठी ७ हजार, विहिरीसाठी पंधरा हजार असे गोरगरीब जनतेकडून पंचायत समितीतल्या अधिकाऱ्यांना देण्यासाठी पैसे उकळत असल्याचा आरोप शेळके यांनी केला. ही बाब शेळके यांनी रेकॉर्डींग सहीत वरीष्ठांना कळविली. परंतु अद्याप गुन्हा दाखल झाला नाही. दलित वस्तीचे पाच लाख रुपये काम न करता उचलले त्याच्यावर चौकशी समिती नेमली मात्र ही चौकशी समिती २५ दिवस झाले तरी गावाकडे येत नाही. या कारणामुळेच पंचायत समिती कार्यालयात येऊन शेळके यांनी भीक मागो आंदोलन केले.

पान १ वरून पुढे...

## राज्यात कोरोना...

माहिती सात रोग तज्ञ देत आहेत. राज्यभरात सध्या एकूण २७८ सक्रिय रुग्ण असून जानेवारी २०२५ पर्यंत ७८३० कोविड चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ३६९ रुग्ण बाधित असून सोमवारी ६९ नवीन रुग्णांची नोंद राज्यात झाली. नव्या रुग्णांमध्ये मुंबईत सर्वाधिक रुग्ण असून राजधानीत ३७, ठाण्यात १९, नवी मुंबई सात पुणे दोन लातूर एक पिंपरी चिंचवड एक रायगड कोल्हापूर प्रत्येकी एक असे रुग्ण आहेत. जानेवारीपासून आत्तापर्यंत केवळ चार रुग्णांचा मृत्यू झालाय. मृत्यू झालेले रुग्ण गंभीर सहव्याधींनी बाधित होते.

## युवासेना पदाधिकारी...

बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकारी यांना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्यात आल्या आणी त्या सुद्धा सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेब यांच्या हस्ते, दुसरी गोष्ट ही कि आपलेच हात आणी आपलीच पाठ थोपटून घेण्याचा प्रकार युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्याकडून करण्यात आलेला दिसून आला. कारण महाराष्ट्र राज्यात जशी युवकांच्या हृदयात युवा सेना आहे तशी ती बीड जिल्ह्यातील तरुणांच्या हृदयात देखील आहे. परंतु ही युवा सेना तरुणांच्या हृदयात पोहचवनारे खरे शिलेदार हे दुसरेच आहेत हे संपूर्ण जिल्ह्याला माहिती आहे. मात्र बीड जिल्ह्यात युवा सेना पोहोचवण्याचे काम फक्त मीच केले अशी पाठ बाजीराव चव्हाण स्वतःच थोपटून घेत आहेत अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनता यानिमित्ताने करत आहे.माझे बीड जिल्ह्यात शेकडो निष्ठावंत पदाधिकारी आहेत असे दाखवून देण्याचा केविलवाणा प्रयत्न परवाच्या स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्याच्या प्रकारात कळून चुकला. युवा सेना वाढवणारे खरे शिलेदार वेगळेच मात्र माझ्या

पान १ वरून पुढे...

मुळेच युवा सेना जिल्ह्यात वाढली, पोहचली, युवा सेनेचा विस्तार झाला, आणी हे सगळं माझ्या मूळे आणी माझ्या या निष्ठावंता मुळेच शक्य झाले त्यामुळे माझ्या या अमुक तमुक निष्ठावंतांना वरिष्ठाच्या हस्ते स्कॉपीओ गिफ्ट दिल्या अशी सुंदर जाहिरातबाजी दिसून आली आणी माझ्या सोबत किंवा माझ्या मागे राहा म्हणजे मि तुम्हाला गाड्या गिफ्ट देऊ शकतो असे आमिष नकळत युवकांना बाजीराव चव्हाण यांच्याकडून देण्यात आल्याचे नागरिकां मधून बोलले जाऊ लागले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात असे शेकडो युवा सेनेचे निष्ठावंत पदाधिकारी आहेत, मग बाजीराव चव्हाण हे या सर्वाना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देणार आहेत काय? परवाच्या या अजब प्रकारा मूळे बीड जिल्ह्यातील नागरिक म्हणू लागले आहेत कि... ज्या पदाधिकारी यांना गाड्या खरच वाटल्या ते युवासेना पदाधिकारी आहेत का?

फक्त तरुण आणी नेता खुश होण्यासाठी नुसत्याच लाडया-गोड्या आहेत असा आरोप युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संप्रुण मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी प्रसिद्ध पत्रका द्वारे केला आहे

## बीड पोलीस...

उस्मान शेख यांची बदली वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून झाल्याचा आरोप झाला होता. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांनीही गंभीर आरोप केले होते.

बीडवरून लातूरला बदली- बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांची लातूरला बदली झाली आहे. त्यांच्या जागी स्थानिक गुन्हे शाखेचा पदभार कोणाकडे दिले जातो, हे पाहावे लागणार आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये बीडच्या पोलिसांवरती गंभीर आरोप झाले. त्यामध्ये बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्यावरही गंभीर आरोप करण्यात आले होते.

पान १ वरून पुढे...

उस्मान शेख यांची नियुक्ती वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून झाल्याचा आरोप झाला होता. शेख यांच्या नियुक्तीचा आरोप भाजप आमदार सुरेश धस सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांनी केला होता. यानंतर बीडची पोलीस यंत्रणा आणि त्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावंत बीडमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्यासह आता ठाणे प्रमुखांच्याही बदल्या करण्याचं ठरवलं आहे. यामध्ये प्रमुख समजली जाणारी शाखा म्हणजे स्थानिक गुन्हे शाखा या स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख उस्मान शेख यांची बदली आता करण्यात आली आहे. त्यांची बदली लातूरला करण्यात आली आहे.

## शेतजमीनच्या कामात...

छत्रपती संभाजी नगर, याची घरझडती घेतली असता खालील प्रमाणे मौल्यवान मालमत्ता मिळून आली आहे.

१) रोख रक्कम-१३,०६,३८०/-

२) सोन्याचे दागिने - ५८९ ग्रॅम किंमत अंदाजे, ५०,९९,५८३/-

३) चांदीचे दागिने- ३ किलो ५५३ ग्रॅम किंमत ३,३९,३४५/-

मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम अशी एकूण किंमत- ६७,४५,३०८/- रुपये मिळून आले आहेत.

दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे पुन्हा एकदा महसूल आणि जिल्हा प्रशासनातील भ्रष्टाचाराचं पितळ उघडं पडलं असून शासकीय फाईलवर वजन ठेवल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांची कामे होत नाहीत. विशेष म्हणजे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामार्फत सर्वसामान्य व शेतकरी वर्गाला दिसाला देण्यासाठी चांगले निर्णय घेतले जात आहेत. त्यामध्ये, वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासंदर्भातही महत्त्वाचा निर्णय काही दिवसांपूर्वीच घेण्यात आला आहे.

पान ४ वरून पुढे...

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी...

घेत आहेत ही तयारी पाहता, जयंतीच्या दिवशी होणारा उत्साह अधिकच वाढणार असल्याचे दिसत आहे. संपूर्ण गाव अहिल्यादेवींच्या प्रति आदराने नतमस्तक होण्यासाठी सज्ज झाले आहे.जयंती दिनी, सकाळी १० वाजता प्रतिमा पूजन आणि ध्वजारोहण करण्यात येईल. त्यानंतर दुपारी ४ वाजता गावभर अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषा केलेले नागरिक, ढोल-ताशांचा गजर, आकर्षक चित्ररथ आणि अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याचे दर्शन घडवणारे देखावे सहभागी होणार आहेत. मिरवणूक सिरसाळ्यातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात येणार असून, पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये ती पाहण्यासाठी आणि त्यात सहभागी होण्यासाठी उत्सुकता दिसून येत आहे. या मिरवणुकीतून अहिल्यादेवींच्या कार्याला आदरांजली वाहण्यात येणार आहे. आयोजक समितीने दिलेल्या माहितीनुसार, मिरवणुकीच्या तयारीला वेग आला असून, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांकडून नियोजनबद्ध काम सुरू आहे. शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि लोककल्याणकारी वृत्तीने समाजाला एक नवी दिशा दिली. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या त्रिशताब्दी जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि नवीन पिढीने त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घ्यावी, हा या आयोजनामागे मुख्य उद्देश आहे. आयोजक समितीच्या वतीने दिनेश काळे, सुनील काळे, मनोज काळे, गणेश गवळी, अक्षय काळे यांनी सिरसाळा परिसरातील सर्व समाज बांधवांना या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होऊन अहिल्यादेवींना आदरांजली वाहण्याचे आवाहन केले आहे.

पान ४ वरून पुढे...

## पात्र शेतकऱ्यांना...

करिता डी.एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तेते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि पत्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ चे इष्टांक रु १७०७ कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे. चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन म्हटले आहे. डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

## तांदळा उपोषणकर्त्यांची...

पान ४ वरून पुढे...

त्यांनी उपचार घ्यावे यासाठी तांदळा ग्रामस्थ व बाहेर ठिकाणहून आलेले शेतकरी त्यांना आग्रह करीत आहेत, मात्र शासन जो पर्यंत मागण्या मान्य करीत नाही तो पर्यंत उपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या प्रकृतीला काही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. याच दरम्यान चकलांबा पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

## युवा सेना...

कसलाही मुहूर्त, कोणतेही कारण, कशाचेही औचित्य न साधता एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. त्यांनी त्यांनी चिंच, नारळ, आंबा, जाम, लिंब, वड, पिंपळ हे झाडे लिंबाजी जाधव, महादेव मतकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख) विलास मस्के, फुलचंद नेवाळे, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव, सचिन गाडे, गणेश नेवाळे, विश्वनाथ जाधव, रामदास कदम यांच्या उपस्थितीमध्ये लावले.

## सिने अभिनेते...

त्यासोबतच त्यांनी अंबाजोगाईकरांची अतिशय जिव्हाळ्याची अशी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक तथा बँकेच्या व्यवहाराबद्दल, तसेच मोदी लर्निंग सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाबद्दल देखील आपुलकीने चौकशी केली. यादरम्यान अभिनेते रितेश देशमुख यांना अंबाजोगाई शहरात येण्याचे निमंत्रण राजकिशोर मोदी यांनी दिले असतांना रितेश यांनी शूटिंग नसल्यास अथवा पूर्वनियोजित काही कार्यक्रम नसल्यास अंबाजोगाईला नक्की येईन अशी ग्वाही याप्रसंगी दिली.

## नेकनूर पोलिसांचा....

गुळवे कुटुंबाने चोरट्याला पकडले आणि दोरीने बांधून ठेवले.

पान ४ वरून पुढे...

त्यानंतर त्यांनी तातडीने नेकनूर पोलीस ठाण्याला माहिती दिली. मात्र, इतक्या गंभीर घटनेनंतर देखील पोलीस तब्बल एक तासाने घटनास्थळी पोहोचले. ही दिरंगाई गंभीर बाब असून, या वेळेत चोरट्याने शस्त्राचा वापर केला असता, जीवितहानी झाली असती, तर जबाबदार कोण? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या काही दिवसांपूर्वी याच परिसरातील शिंदे कुटुंबाच्या घरी मोठी चोरी झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा अशीच घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. गस्त वाढवून, नागरिकांसोबत चर्चा करून त्यांच्या सूचना गांभीर्याने घेऊन त्यांच्या सुरक्षेचा विश्वास पुनः स्थापित करावा, अशी मागणी आता स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

## श्री क्षेत्र चाकरवाडी...

राजुरी नवगण), दि. १० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुंद काका जाटदेवळेकर, दि. ११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२ होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे. दि १२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि. १४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे. कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर,भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह. भ. प. महादेव महाराज ( तात्या) चाकरवाडीकर यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जायकवाडी धरणात ५० वर्षांत मे महिन्यात प्रथमच ४० दलघमी पाण्याची आवक



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जायकवाडी धरणात यंदा मागील ५० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच मे महिन्यात धरणात ४० दलघमी पाण्याची आवक झाली आहे. यामुळे जून अखेरीपर्यंत ठरवलेली पाणी पाळी रद्द करण्यात आली असून, सुमारे ६ टीएमसी पाण्याची मोठी बचत झाली आहे.

सध्या जायकवाडी धरणात १३८१ दलघमी म्हणजेच सुमारे २९.६६टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. यामधून रब्बी हंगामासाठी आणि उन्हाळ्यातील गरजांसाठी औरंगाबाद, जालना, बीड आणि परभणी या चार जिल्ह्यांना सुमारे ३७ टीएमसी पाणी देण्यात आले होते. दरम्यान, बाष्पीभवनामुळे साडेदहा टीएमसी पाणी वाया गेले आहे. पावसाळ्यापर्यंत जायकवाडीत साधारणपणे पाण्याची फारशी आवक होत नाही. मात्र यावर्षी कोपरगाव आणि वैजापूर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापूर्वीच जायकवाडीत दीड टीएमसी पाणी जमा झाले आणि एकूण आवक ४० दलघमीवर पोहोचली.

जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून ३० जूनपर्यंत पाणी सोडण्याचे नियोजन रद्द करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता एस. सब्बीनवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८०० क्युसेकने सुरू असलेला विसर्ग हळूहळू कमी करत सोमवारी संध्याकाळी पूर्णतः थांबवण्यात आला. त्यामुळे यंदा संभाव्य पाणीटंचाईपासून मराठवाड्याला दिलासा मिळाला आहे.



*बीड शहरातील बार्शी रोडवर नाला तुंबल्याने जय महाराष्ट्र हॉटेल मध्ये रोड लगत असलेल्या अनेक घरांमध्ये असे नाल्याचे पाणी शिरल्याने नदीचे स्वरूप आले होते. बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी आतातरी डोळे उघडून बीड शहरातील नागरिकांचे हाल बघावेत अशी मागणी जनसामान्य नागरिकांमधून होत आहे .*

## तय्यबनगर येथील गरीब मुस्लिमांचा लढा: ३० वर्षांपासून , आता पक्क्या घरांसाठी वक्फ बोर्डाला साकडे!- सय्यद एजाज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील तय्यबनगर येथील सर्वे नंबर २१२ वरील खिदमत मासच्या जमिनीवर गेल्या ३० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या गरीब मुस्लिम कुटुंबांनी पुनर्वसन आणि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पक्की घरे बांधण्यासाठी महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडे परवानगी मागितली आहे.

सय्यद एजाज इफ्तेखार अहमद वक्फ बोर्डचे अध्यक्ष समीर काझी यांना सादर केलेल्या निवेदनात, या परिसरातील रहिवासी दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असून मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे नमूद केले आहे.



या रहिवाशांचे वास्तव्य ३० वर्षांपासून असले तरी, खिदमत मासचे सातबारा वर नाव असलेली लोकांची कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. वक्फ बोर्डाकडे कायदेशीर पुनर्वसनासाठी परवानगी आणि आवश्यक कागदपत्रे, जसे की ना-हरकत प्रमाणपत्र (NOC), उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. यामुळे या कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येईल. या भागातील रहिवाशांचे दीर्घकालीन वास्तव्य, त्यांची आर्थिक गरज आणि योजनेच्या निकषांनुसार पात्रता यांचा उल्लेख आहे.तसेच सर्व आवश्यक कागदपत्रे देण्याची तयारी दर्शवली असून, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांना माजी नगरसेवक सय्यद एजाज, हाजी जे.डी. शहा पत्रकार शेख इर्शाद यांनी निवेदन देत सकारात्मक विचार करुन प्रतिसाद आणि त्वरित कार्यवाही करुन NOC देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.



*बीड : विपूल बाळासोहब पिंगळे युवा कार्यकारी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा मराठवाडा निरिक्षक यांनी दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयास सदिच्छा भेट दिली त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, अमीन शेख छाया चित्रात दिसत आहेत.*

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती बीड जिल्हा अध्यक्ष पदी मा.शिवाजीराव हिंदोळे पाटील यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले यांच्या निवासस्थानी आज व्यापक बैठकीचे आयोजन केले गेले होते, भष्टाचार निर्मुलन समिती चे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.प्रदिप पाटील खडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील महिला सक्षमीकरण व महिलांचे विषयी प्रश्न सोडण्यासाठी महिला कार्यकर्त्याची निवड करण्याचे आदेश दिले गेले होते त्यानुसार महिलांच्या धडाडीच्या कार्यकर्त्या जेणेकरून महिलांचे



संघटन व महिला विषयी आस्था प्रेम असणाऱ्या सौ.सारिका पाटील यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर बीड जिल्हा अध्यक्ष मा.शिवाजीराव हिंदोळे, मराठवाडा विभागीय कार्यकारी अध्यक्ष सौ.रूपालीताई देशपांडे, बीड जिल्हा युवती जिल्हाध्यक्ष कु.समीक्षाताई वाघमारे , या वेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे यांची निवड करण्यात आली,तसेच मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके मराठा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष व पौडूळ विद्यामान सरपंच बापूसाहेब मराडे, भष्टाचार निर्मुलन समिती बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर बप्पा कवचट, राठोड, बालाजी इंगोले , गणेश सुर्वे, बाळासाहेब देवगुडे, पत्रकार,सौ. सीमाताई शिलावंत, सौ.जाधव मॅडम,बंडू आप्पा कोलंगडे,बंडू घोडके, गणेश ढगे,विलास इंगोले, बाळासाहेब भोरे,तसेच मित्र परिवार व पदाधिकारी उपस्थित होते.

## बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट (Ph.D.) जाहीर

### मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांवरील गजेंद्र बडे यांचे ठरले राज्यातील पहिले संशोधन

**पुणे । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र प्रभाकर बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही पदवी जाहीर केली आहे. बडे यांनी 'मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास' या विषयावर संशोधन करुन पुणे विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने हा शोध प्रबंध स्विकारला आहे. मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा



अभ्यास' या विषयावर राज्यात याआधी एकही संशोधन झालेले नाही. त्यामुळे या विषयावरील बडे यांचे हे संशोधन राज्यातील एकमेव संशोधन ठरले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील मराठी संशोधन केंद्रात हे संशोधन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गजेंद्र बडे यांनी हे संशोधन पूर्ण केले. पीएच. डी. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी जाहीर झाल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस आणि अहमदनगर महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर शेलार यांनी गजेंद्र बडे यांचे अभिनंदन केले आहे. गजेंद्र बडे हे मूळचे बीड जिल्ह्यातील दुकडेगाव (ता.वडवणी) या छोट्याशा खेड्यातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून, मागील २५ वर्षांपासून पुण्यात पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत.

## पाटोदा शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी संजय शेठ कांकरिया यांचे दुःखद निधन

### सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सक्रिय असलेले स्मितभाषी व्यक्तिमत्त्व हरपले

**पाटोदा । प्रतिनिधी**

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक नव्हे तर धार्मिक कार्यक्रमांमध्येही हिरारीने सहभागी होणारे, सर्वांचे आवडते, स्मितभाषी व्यक्तिमत्त्व संजय शेठ कांकरिया यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटोदा शहरासह संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



संजय शेठ कांकरिया हे पाटोदा शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी असून, ते पाटोदा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य म्हणून कार्यरत होते.ते माजी आमदार भीमराव धोंडे यांचे कट्टर समर्थक म्हणूनही ओळखले जात. आपल्या मनमिळावू, हसतमुख स्वभावामुळे ते समाजात अत्यंत लोकप्रिय होते.सामाजिक, धार्मिक आणि जनसेवेशी नेहमीच बांधील राहणारे संजय शेठ हे पाटोद्याच्या सार्वजनिक जीवनाचा एक अविभाज्य भाग होते. अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, मंदिरे, उत्सव, दानधर्म, तसेच समाजहिताचे विविध उपक्रम हे त्यांच्या पुढाकारानेच शक्य झाले होते.त्यांच्या पार्थिवावर रात्री सातच्या सुमारास पाटोदा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय मंडळी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, डॉक्टर,वकिल, पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटच्या दर्शनासाठी पाटोद्याच्या सर्व थरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.संजय शेठ यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी फार लवकर भरून निघणारी नाही. त्यांच्या योगदानाची आठवण पाटोद्यातील प्रत्येक सामाजिक कार्यक्रमांमध्ये,कायम येत राहणार आहे. संजयशेठ भावपूर्ण श्रद्धांजली- तुमचं हसतमुख रूप, समाजासाठीचं निस्वार्थ योगदान आणि सर्वांशी असलेली आत्मीयता - हेच तुमचं खरं वैभव होतं. शेठ, तुमची आठवण सदैव राहील.

## हज कमिटीचे कोचिंग इन्स्टिट्यूट पुन्हा सुरु

### मोदी सरकारच्या निर्णयामुळे देशात २० राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मिळणार फायदा : सलीम जहाँगीर

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता एक मोठे पाऊल उचलले आहे. बंद झालेले हज कमिटीचे कोचिंग इन्स्टिट्यूट पुन्हा सुरू करण्याचा निर्णय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अल्पसंख्याक विकास मंत्री किरण रिजूजी यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे देशातील २० राज्यांमधील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना फायदा होणार असल्याचे सांगत भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि किरण रिजूजी यांचे आभार मानले आहेत.

हज कमिटी ऑफ इंडियाने मुंबईतील हज हाऊस रेसिडेन्शियल कोचिंग



इन्स्टिट्यूट (HHRCI) येथे नागरी सेवा परीक्षांसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. २२ मे रोजी, एचसीआयने नागरी सेवा परीक्षा २०२६. (प्राथमिक -सह-मुख्य) साठी मोफत निवासी प्रशिक्षणासाठी उमेदवारांकडून अर्ज मागवणारी अधिसूचना जारी केली. भारतीय प्रशासकीय सेवा आणि संबंधित सेवांमध्ये सामील होऊ इच्छिणाऱ्या अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण आणि प्रशिक्षण सुविधा केंद्र २००९ मध्ये सुरू झाले आणि २५ विद्यार्थ्यांना अधिकाऱ्यांची निवड करणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यास मदत झाली. तथापि, एचसीआयने २०२३ नंतर नवीन बॅचसाठी अधिसूचना जारी केली नाही. हे केंद्र पुन्हा सुरू व्हावे अशी मागणी मुस्लिम समाजातून सरकारकडे करण्यात येत होती. अखेर केंद्र सरकारने हे प्रशिक्षण केंद्र पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेत

मुस्लिम समाजासाठी स्पर्धा परीक्षांच्या प्रवाहात घेतले आहे. प्रवेश परीक्षा आणि मुलाखतीनंतर प्रशिक्षणार्थींची निवड केली जाईल. १३ जुलै २०२५ रोजी देशभरातील २१ केंद्रांवर या प्रवेश परीक्षा घेतल्या जातील. एकूण १०० उमेदवारांची निवड केली जाईल, त्यापैकी ८० टक्के जागा मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी राखीव असतील आणि २० टक्के जागा अनुसूचित जाती/जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखीव असतील. २१ जून २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातील. ११ ऑगस्ट २०२५ पासून वर्ग सुरू होतील. पात्रता, वयोमर्यादा, आणि निवड प्रक्रियेचे तपशील, अधिक माहितीसाठी https://marathimusalman.in/?p=1007 या लिंकवर क्लिक करण्याचे आवाहन भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी केले आहे.

# महिला आणि बालकांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल - महाराष्ट्र सरकार "आदिशक्ती अभियान " राबवणार - सामाजिक कार्यकर्तें बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून, सन २०२५-२६ पासून राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्या सोडवून त्यांना खऱ्या अर्थाने सक्षम



बनविणे या अभियानाअंतर्गत ग्रामस्तर ते राज्यस्तरापर्यंत विशेष समित्या स्थापन करून, प्रत्येक ग्रामपंचायतीने अनिवार्य सहभाग नोंदवायचा आहे. पुढील १५ दिवसांत ग्रामसभांच्या माध्यमातून या अभियानाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी सांगितले आहे.

राज्याची सुमारे ६०% लोकसंख्या महिला व बालकांचीच आहे. त्यांच्यापर्यंत शासनाच्या सर्व योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविणे, हा आदिशक्ती अभियान चा मुख्य हेतु आहे.

या अभियानातून आपल्याला काय साध्य करायचे आहे :

हुंडा आणि बालविवाह यांसारख्या अनिष्ठ प्रथांचे समुळ उच्चाटन केले जाईल.

एकल महिला, विधवा, परित्यक्ता यांच्यासाठी संरक्षण आणि मदतीची यंत्रणा उभारली जाईल. महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनास चालना दिली जाईल.

महिलांना ITI व कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल.

कायदे, योजना व अधिकार याबाबत जनजागृती केली जाईल.

बाल संरक्षण, पोषण, आरोग्य व शिक्षण समित्यांद्वारे सर्वसमावेशक विकास साधला जाईल.

किशोरींच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी समित्या काम करतील.

पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत वृक्षलागवड व त्यांचे संगोपन ग्राम पंचायतीकडून केले जाईल.

या अभियानाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार दिले जातील: तालुकास्तर : प्रथम ₹१ लाख, द्वितीय ₹५० हजार, तृतीय ₹२५ हजार, जिल्हास्तर : प्रथम ₹५ लाख, द्वितीय ₹३ लाख, तृतीय ₹१ लाख, राज्यस्तर : प्रथम ₹१० लाख, द्वितीय ₹७ लाख, तृतीय ₹५ लाख

या अभियानामुळे राज्यभर सशक्त, सुरक्षित आणि स्वावलंबी महिला सुरक्षित समाज घडविण्याचा महायुती सरकारने निर्धार केला आहे. त्यांचे स्वागत साऊ एकल महिला पुनर्वसन समिती महाराष्ट्र राज्य चे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.२८ मे २०२५ पान ४

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव: २ जून रोजी भव्य मिरवणूक, जय्यत तयारी सुरू! मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त, म्हणजेच त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त, येत्या २ जून २०२५ रोजी भव्य आणि उत्साही मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी सिरसाळा आणि परिसरातील धनगर समाज बांधवांमध्ये प्रचंड उत्साह असून, जय्यत तयारी सुरू आहे. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश काळे, उपाध्यक्ष लखन काळे आणि सचिव प्रकाश काळे यांनी या कार्यक्रमाची माहिती दिली असून, त्यांनी समाज बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. गावात उत्साहाचे वातावरण आणि जय्यत तयारी– दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी सिरसाळ्यात अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. यंदाचा हा त्रिशताब्दी जन्मोत्सव असल्याने उत्साहात आणखी भर पडली आहे. परळी–बीड महामार्गावर रस्त्याच्या मधोमध असलेल्या सर्व पोलवर लावलेले पिवळे ध्वज लक्ष वेधून ▶▶ उर्वरित पान २ वर

# पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा; बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा

## डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्राम ध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हम भाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते ▶▶ उर्वरित पान २ वर



### ●सर्व कृषी सेवा केंद्र बाहेर शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर लावणारा – विवेक जॉन्सन

या मागण्यांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपरोक्त विषयांवर जिल्हा प्रशासन तत्परपणे काम करेल असे आश्वासन दिले. त्याचबरोबर बोगस बियाणे आणि बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांना समस्या निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने टोल फ्री क्रमांक आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांना समस्या पोहोचतील याकरिता एक मोबाईल नंबर सर्व कृषी सेवा केंद्रांच्या बाहेर जाहीर रित्या लावण्यात येईल,डी.एल.सी.सी सभेमध्ये कर्ज वाटपाचा नियमित घेण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

# तांदळा उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

## शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त, शासन-लोकप्रतिनिधींनी दखल घ्यावी

बीड । प्रतिनिधी

जायकवाडी धरणाचे पाणी वंचित भागातील शेतकर्यांना मिळावे, यासाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंके गेल्या रविवारपासून दिवसांपासून उपोषण करीत आहेत. मंगळवारी त्यांची प्रकृती खालावल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. या उपोषणाची दखल लोकप्रतिनिधी व शासनाने घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील शेतीला मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांना लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा तांदळा येथे रविवारपासून सुरू असून अजय पाटील साळुंके हे उपोषणाला बसले आहेत. उपोषणामुळे त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच त्यांना साखरेचा आजार असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●नादुरुस्त यंत्राने तीनदा तपासणी

मंगळवारी मादळमोही येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी तपासणीसाठी आले होते. मात्र, पाटील यांची रक्तातील साखर अधिक दाखवली, ही शंका पाटील यांना वाटल्याने त्यांनी पुन्हा दोनवेळा साखर तपासली. यावेळी सदर ग्लूकोमीटर नादुरुस्त असल्याचे डॉक्टरांनी मान्य केले. यासह यावेळी पल्स तपासण्याचे यंत्रही खराब असल्याचे दिसून आल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

### ●शेतपाण्याची तरतूद नाही, मग पाणी मिळणार कसे– गुळवे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, हे सोमवारी नांदेड येथे आले होते. येत्या पाच वर्षांत मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेतून मराठवाड्यातील शेतीला पाणी देऊ, असे म्हणाले. मात्र, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेतीसाठी पाणी देण्याची तरतूद नाही, या योजनेतून शेतीला पाणी ही तरतूद वगळली आहे, असे असल्याचे या योजनेतून शेतीला पाणी कसे मिळणार असा प्रश्न लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी उपस्थित केला आहे. शिवाय मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेती व उद्योगांना पाणी द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांच्या वतीने बीड शहरात 101 झाडांची लागवड

बीड । प्रतिनिधी

उन्हाळ्यात बीडचा पारा ४४ अंशावर गेल्याने नागरिकांच्या जिवाची लाही-लाही झाली. युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी तेव्हाच जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला होता. मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्याने त्यांनी चिंच, नारळ, आंबा, जाम, लिंब, वड, पिंपळ यासह सावली, फळ देणारे आणि वर्षानुवर्ष टिकणारे झाडे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी लावले. या उपक्रमाबद्दल यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.



बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. वृक्ष कमी झाल्याने त्यात अणखी भर पडली. प्रत्येकानी किमान दोन झाडे लावले पाहिजेत असे फक्त सोशल मीडियावर सेट्स ठेवले जाते.

### ●लावलेले प्रत्येक झाड जगवणार

आम्ही लावलेले वृक्ष हे एकादा उपक्रम राबवायचा आहे म्हणून लावले नाहीत. लावलेले प्रत्येक झाड जगवण्यासाठी आम्ही मेहनत घेणार आहोत. त्यामुळेच आम्ही चिंच, नारळ, आंबा, जाम,लिंब,वड, पिंपळ यासारखे सावली आणि फळ देणारे झाडे निवडली आहेत. – अविनाश जाधव, युवा सेना मराठवाडा निरीक्षक

प्रत्यक्षात मात्र कृतीत ते उतरत नाही. मात्र युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव ▶▶ उर्वरित पान २ वर

# सिने अभिनेते रितेश देशमुख व राजकिशोर मोदी यांच्या भेटीत विविध विषयांवर चर्चा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठवाड्याचे सुपुत्र सुप्रसिद्ध सिने अभिनेते रितेश देशमुख तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांची बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या कौटुंबिक भेटीत उभयतांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. राजकिशोर मोदी हे लोकनेते स्व विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांची भेट विलासराव देशमुख यांचे सुपुत्र सिने अभिनेते रितेश देशमुख यांच्याशी भेट झाली. या भेटी दरम्यान त्यांच्यात राजकीय, सामाजिक तसच सांस्कृतिक विषयावर सांगोपांग



चर्चा झाली.

रितेश देशमुख यांच्या येऊ घातलेला छत्रपती शिवाजी या चित्रपटा विषयी माहिती देतांना रितेश देशमुख यांनी सांगितले की हा चित्रपट जवळपास सहा भाषांम ध्ये येणार असून त्याचे स्वरूप हे भव्यदिव्य अशा स्वरूपात असणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेमध्ये रितेश देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, जीनिलिया देशमुख, महेश म ांजरेकर, सचिन खेडकर हे प्रमुख भूमिकेत असल्याचे रितेश देशमुख यांनी सांगितले. सदरील चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम या सहा भाषेत हा प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल राजकिशोर मोदी यांनी रितेश देशमुख आणि त्यांच्या संपूर्ण टीमला (मुंबई फिल्म कंपनी) मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर स्व.विलासरावजी देशमुख यांचे अंबाजोगाई करांविषयीचे नाते याविषयी अतिशय दिलखुलास पणे चर्चा झाली. रितेश देशमुख यांनी देखील संपूर्ण अंबाजोगाई वासीयांचे आस्थेवाईकपणे चौकशी केली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# नेकनूर पोलिसांचा 'आळस'च बनलाय नाकर्तेपणाचा 'कळस'

## नेकनूर मध्ये नागरिकांनीच पकडला चोर पेट्रोलिंग नुसती नावालाच का नागरिकांचा सवाल ?

नेकनूर । प्रतिनिधी

नेकनूर येथील अंबिका चौक होलेरवाडा परिसरात शनिवारी मध्यरात्री घडलेल्या चोरीच्या प्रयत्नात चोरट्याला रंगेहाथ पकडून गावकऱ्यांनी पोलिस स्टेशनला आणून यामधून पोलीस असूनही पोलीस जे करू शकत नाहीत ते नागरिकांनी करून दाखवल्याने पोलिसांचा



नाकर्तेपणा उघड झाल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे.

यामध्ये गुळवे कुटुंबाने आपल्या कुटुंबाचे संरक्षण करत चोरट्याला बांधून ठेवले, मात्र पोलीस तासभरानंतर घटनास्थळी पोहोचल्याने नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास कमी होत चालला असल्याने पोलिसांनी अशा घटनांबाबत गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. सर्जेराव गुळवे यांच्या घराच्या मुख्य दरवाजावर शनिवारी पहाटे दोनच्या सुमारास एक चोरटा जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न करत होता. कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे गुळवे कुटुंब जागे झाले. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता चोरटा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करत होता. प्रसंगावधान राखून ▶▶ उर्वरित पान २ वर



*गेवराई: काजळवाडी तालुका गेवराई येथील नदीत अचानक पाणी वाढले.. पुराच्या पाण्यात वाहून जाता जाता शेतकरी बालंबाल बचावला.*

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह


## ▸प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा

### ▸माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास उपस्थित रहावे – महादेव महाराज

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्याचे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन व प. पू. श्री प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा होणार आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तपोनिधी, शांतीब्रह, गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे. भव्य अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू.





प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि. ०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभंग संकीर्तन सेवा दि. ०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर), दि. ०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. वा. मंडळ), दि. ०९ जून सोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, ▶▶ उर्वरित पान २ वर







CMYK